# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

गो.वि./म.वि / 1966 /2021 दिनांक: 26 /03/2021

## परीपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :– उच्च शिक्षण संचालनालयातर्गंत अशासकिय अनुदानित वरीष्ठ महाविद्यालयांतील प्राचार्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

संदर्भ :– १.मा. संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्रमांक/पदभ/११२१/प्र. क्र.१० मवि.१/५५९३/ दिनांक २३/०३/२०२१ नुसार

२.शासन परीपत्रक क्रमांक /संकिर्ण/२०१७/प्र. क्र.१७०/म. शि.५/दि. २३ मार्च २०२१ नुसार

३..शासन परीपत्रक क्रमांक /संकिर्ण/२०१७/प्र. क्र.१७०/म. शि.५/दि. ८ जानेवारी २०२१ नुसार

महोदय,

उपरोक्त संदर्भाकीत विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते कि, दिनांक ८ जानेवारी २०२१ च्या शासन परीपत्रकानुसार विद्यापीठाशी संलग्नित अनुदानित महाविद्यालयाचे प्राचार्य पदे रिक्त झालेले आहे तसेच ज्या महाविद्यालयाने प्राचार्य पद भरण्याकरीता नाहरकत प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यापीठाकडे अर्ज सादर करण्यात आलेले होते. अशा महाविद्यालयांना विद्यापीठाकडुन नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. परंतु संदर्भ क्रमांक २ च्या प्राप्त पत्रानुसार महाविद्यालयांतील प्राचार्य रिक्त पद दिनांक ०३/०५/२०२० पर्यंतचे असल्याबाबतचे खातरजमा करणे आवश्यक आहे असे सदर परीपत्रकात नमुद असल्याने ज्या महाविद्यालयांचे दिनांक ०३/०५/२०२० नंतर प्राचार्य पद रिक्त झालेले आहे. अशा महाविद्यालयांना विद्यापीठाकडुन प्राचार्य पद भरण्याकरीता नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. अशा महाविद्यालयांचे नाहरकत प्रमाणपत्र विद्यापीठाकडुन रद्द करण्यात येत आहे करीता सदर बाबत तातडीने नोंद घ्यावी ही विनंती.

मा. कुलगुरु यांच्या मान्यतेनुसार

(डॉ. जी. डी. दुबे)
प्र.उपकुलसचिव(म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र संलंग्नित :– उपरोक्तप्रमाणे

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फोन नं.०२०/२६११११५३

क्रमांक : पदभ/११२१/प्र.क्र.१० मवि-१ / 5593 दिनांक २३.०३.२०२१ 23 MAR 2021

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
सर्व कुलसचिव, अकृषी विदयापीठे

**विषय :उच्च शिक्षण संचालनालयाअंतर्गत अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त पदे भरणेबाबत**

**संदर्भ** :उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१७/प्र.क्र१७०/मशि-५ दि.२३.०३.२०२१

उपरोक्त विषयी संदर्भीय शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे. सदरहू परिपत्रकान्वये दिलेल्या संबंधित सूचनांच्या अनुषंगाने विषयांकीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

तसेच सदर परिपत्रकातील दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करणेबाबत अधिनस्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना सूचना देण्यात याव्यात व कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करावा.

**(डॉ.धनराज माने)**
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे- १

प्रत : मा प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव

उच्च शिक्षण संचालनालयांर्गत अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त पदे भरण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१७/प्रक्र.१७०/मशि-५,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- २३ मार्च, २०२१

वाचा:-

(१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१७/प्रक्र.१७०/मशि-५ दिनांक २३.४.२०१८.
(२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-२ दिनांक ०४.५.२०२०.
(३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१७/प्रक्र.१७०/मशि-५ दिनांक ०८.०१.२०२१ व दिनांक १३.०१.२०२१ चे पत्र.
(४) उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, पत्र क्रमांक पदभ/११२१/प्र.क्र.१०/ मवि-१/२५४३ दिनांक ०१.३.२०२१.

**परिपत्रक**

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य या संवर्गातील कार्यालय प्रमुखाचे पद हे एकाकी पद आहे. महाविद्यालयातील दैनंदिन प्रशासकीय तसेच शैक्षणिक कामकाजाच्यादृष्टीने तसेच राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती प्रमाणनिकरण (NAAC) मिळण्याकरिता नियमित प्राचार्य कार्यरत असणे आवश्यक आहे. वित्त विभागाच्या दिनांक ०४.५.२०२० च्या शासन निर्णयातील पदभरतीची अट शिथिल करून प्राचार्य या संवर्गातील रिक्त एकूण २६० पदे भरण्यास शासनाच्या संदर्भाधीन दिनांक ०८.०१.२०२१ च्या परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आली होती. परंतु, उच्च शिक्षण संचालनालयाकडून त्यांच्या दिनांक ०१.३.२०२१ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या फेर प्रस्तावानुसार दिनांक ०३.५.२०२० रोजी रिक्त असलेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य संवर्गातील पदभरतीस संदर्भाधीन दिनांक ०८.०१.२०२१ चे आदेश व दिनांक १३.०१.२०२१ चे पत्र अधिक्रमित करून या परिपत्रकान्वये शासनमान्यता देण्यात येत आहे.

२. यांसदर्भात विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) यांनी सदरची बाब काटेकोरपणे तपासून संचालकांच्या शिफारशीसह नाहरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचा प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने शासनास सादर करावा. तसेच प्राचार्यांची रिक्त पदे भरताना या संदर्भात अस्तित्वात असलेले केंद्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य शासन अधिनियम, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रके, आदेश व सूचना त्याचप्रमाणे विहित केलेल्या कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता संबंधीत महाविद्यालयांसह संबंधीत विभागीय सहसंचालक यांनी घ्यावी. यानुषंगाने

प्राचार्य या संवर्गाच्या पदभरतीचा प्रस्ताव सादर करताना रिक्त पद दिनांक ०३.५.२०२० रोजी पर्यंतचे असल्याबाबतची खातरजमा करून तसे प्रमाणपत्र संबंधीत विभागीय सहसंचालक यांनी संचालक (उच्च शिक्षण) यांच्यामार्फत शासनास सादर करणे बंधनकारक आहे. यासंदर्भात कोणत्याही प्रकारची अनियमितता झाल्यास संबंधीत विभागीय सहसंचालकांवर जबाबदारी निश्चिती करून त्यांच्याविरूध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

३. प्रस्तुत पदभरतीच्या संदर्भातील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ अंमलात आणावी आणि नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित झाल्यानंतर विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. तसेच कोविड-१९ च्या प्रादूर्भावामुळे नियुक्ती आदेशाच्या प्रतिक्षेत असलेल्या पदांना नियुक्ती आदेश देण्यासाठीचा प्रस्ताव संचालकांमार्फत शासनास सादर करण्यात यावा. त्याचबरोबर नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ६ महिन्याचा कालावधी संपुष्टात आला असेल, अशा महाविद्यालयांकडून मुदतवाढीचा प्रस्ताव स्विकारून शासनास सादर करताना आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्रांसह सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्यात याव्या.

४. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्यांचा सांकेतांक क्रमांक २०२१०३२३१६१२१५२४०८ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

५. हे परिपत्रक वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२९२/व्यय-५दिनांक १८.३.२०२१ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

DATTATRAYA
RAMBHAU KAHAR

Digitally signed by DATTATRAYA RAMBHAU KAHAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER & TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
Date: 2021.03.23 16:43:52 +05'30'

(द.र.कहार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
३) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) सर्व कुलसचिव, अकृषिक विद्यापीठे
६) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालये.
७) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा, मुंबई/नागपूर, महाराष्ट्र-१/२.
८) सर्व जिल्हा कोषाधिकारी.
९) लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई.
१०) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई-३२.
११) निवडनस्ती/मशि-५.

उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त पदे भरण्यावरील निर्बंध शिथिल करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१७०/म.शि.५,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- ०८ जानेवारी, २०२१.

वाचा:- १) शासन परिपत्रक क्रमांक -संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१७०/मशि-५, दिनांक ०३.०४.२०१८.
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक -अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-२, दिनांक -०४.०५.२०२०.

## परिपत्रक

सद्यस्थितीत कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत वित्त विभागाने शासन निर्णय दि. ०४.०५.२०२० अन्वये राज्यातील पद भरतीवर निर्बंध आणले आहेत. त्यामुळे राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील रिक्त पदे (प्राचार्य/सहाय्यक प्राध्यापक) भरणेबाबतची प्रक्रिया खंडित झाली होती. याबाबत विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान तसेच सदरची भरती प्रक्रिया सुरू करण्यासाठी विशेषत: "प्राचार्य"या संवर्गातील पद भरतीची प्रक्रिया सुरू करण्यासाठी विविध स्तरावरून शासनास प्राप्त होणारी निवेदनांचा सर्वकष विचार करुन अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांची २६० पदे भरण्यास वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०४.०५.२०२० च्या निर्बंधातून सूट देण्यात येत आहे.

२. प्राचर्यांची रिक्त पदे भरताना यासंदर्भात अस्तित्वात असलेले अधिनियम, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रक /आदेश व सूचना त्याचप्रमाणे विहित केलेल्या कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. तसेच यानुषंगाने प्राप्त होणारे प्रस्ताव संबंधित विभागीय सहसंचालक, तसेच संचालकांमार्फत तपासणी करून विभागात कार्यन्वित असलेल्या संगणक प्रणालीद्वारे नाहरकत प्रमाणपत्रासाठी शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावे.

३. हे परिपत्रक वित्त विभागाच्या त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ७६/दिनांक ०५.०१.२०२१ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा सांकेतांक क्र. २०२१०१०८१७३२५३२१०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

VINOD VASANT DALVI

Digitally signed by VINOD VASANT DALVI
DN: c=IN, st=Maharashtra
street=MANTRALAYA MUMBAI
ou=MANTRALAYA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VINOD VASANT DALVI
Date: 2021.01.08 17:37:22 +05'30'

(वि. व. दळवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुंख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

२. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
३. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. सर्व विभागीय सहसंचलाक, उच्च शिक्षण.
६. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
७. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), नागपूर/मुंबई, महाराष्ट्र/मुंबई१/२.
८. लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१०. सर्व जिल्हा कोषाधिकारी यांची कार्यालये.
११. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१२. म.शि.५ कार्यासन, निवडनस्ती.